# १. मराठी माती

माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा;
हिच्या संगाने जागल्या,
दऱ्याखोऱ्यांतील शिळा.

हिच्या कुशीत जन्मले, काळे कणखर हात;
ज्यांच्या दुर्दम धीराने, केली मृत्यूवरी मात.

नाही पसरला कर, कधी मागायास दान;
स्वर्णसिंहासनापुढे, कधी लवली ना मान.

हिच्या गगनांत घुमे, आद्य स्वातंत्र्याची द्वाही;
हिच्या पुत्रांच्या बाहूंत, आहे समतेची ग्वाही,

माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा;
हिच्या संगे जागतील
मायदेशातील शिळा.

– विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज)





Scanned with CamScanner

## शब्दार्थ

माती - भू - (soil)
मृत्यू - मरण - (death)
हात - हस्त - (hand)
पुत्र - मुलगा - (son)
स्वर्ण - सोने - (gold)
शिळा - दगड - (stone)
समता - समानता - (equality)
सिंहासन - राजे-महाराजे बसण्यासाठी सिंह कोरीव आसन - (throne)

## स्वाध्याय

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कशाचा टिळा लावायचा आहे?

...................................................................................

...................................................................................

...................................................................................

२. कुशीत कोण जन्मले?

...................................................................................

...................................................................................

...................................................................................

३. कोणापुढे मान लवली नाही?

...................................................................................

...................................................................................

...................................................................................



Scanned with CamScanner

४. पुत्रांच्या बाहुत काय आहे?

................................................................................

................................................................................

................................................................................

## खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१. कवितेत मराठीच्या वैभवाचे वर्णन कसे केले आहे?

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

## कवितेच्या ओळी पूर्ण करा.

१. हिच्या ................................................................................

................................................................................ मात.

२. नाही ................................................................................

................................................................................ मान.

३. हिच्या ................................................................................

................................................................................ ग्वाही.

## इंग्रजीत शब्द लिहा.

१. ललाट - ........................ २. हात - ........................

३. काळे - ........................ ४. स्वातंत्र्य - ........................



Scanned with CamScanner

५. माती - ..............................

६. हात - ..............................

७. शिळा - ..............................

८. पुत्र - ..............................

## विरुध्दार्थी शब्द लिहा.

१. काळे X ..............................

२. मृत्यू X ..............................

३. मान X ..............................

४. समता X ..............................

## शब्द शुध्द करून लिहा.

१. मातिचा - ..............................

२. शीला - ..............................

३. घूमे - ..............................

४. जागतिल - ..............................

५. मराठि - ..............................

## माझा देश भारत - याविषयी पाच ओळी लिहा.

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................



Scanned with CamScanner

## चित्रवर्णन

**खालील चित्र पाहा. त्याविषयी दहा वाक्ये लिहा.**





Scanned with CamScanner


# २. माझे कष्ट वाया जाणार नाहीत

*प्रसिध्द लेखक व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'करुणाष्टक' या आत्मकथनपर कादंबरीतील हा भाग आहे. बालपणीच्या हलाखीच्या परिस्थितीचे वर्णन त्यात केले आहे. तसेच त्यांच्या आईचा आशावाद व आईचे मुलांसाठी सर्वार्थाने जगणे आपल्याला पाहावयास मिळते.*

ओढ्याच्या पलीकडे झाडांच्या गर्दीत असलेल्या मठात एक साधुपुरुष होता किंवा साधू होण्याची खटपट मनापासून करणारा असा माणूस होता. त्याच्या दाढीचे बरेच केस पांढरे झाले होते; पण अंगाने तो काही फार थकलेला दिसत नसे.



दर आठवड्याच्या गुरुवारी पीठ मागण्यासाठी तो ओढा ओलांडून गावात येई. जी काही दहा घरे मागे, त्यात आमचेही एक घर असे. चार सामान्य गोसाव्यांच्या अंगात असतो तसलाच भगवा पोशाख त्याच्याही असे; पण एका बाबतीत मात्र वेगळा होता. तो आपल्या हातात भोपळ्याचा कटोरा धरून नुसता उभा राही. 'ताई, माई' म्हणून हाका मारीत नसे, का



'बं भोलानाथ'चा गजर करीत नसे. तो मुकाट्याने येई आणि मुकाट्यानं अंगणात उभा राही. आत बाहेर करता करता कुणाचे जेव्हा लक्ष जाईल, तेव्हा त्याच्या कटोऱ्यात पिठाची बुचकुली पडे. ते पडले की, आशीर्वादरूप असे काही मिशातल्या मिशात पुटपुटत, पायांतल्या खडावा वाजवत तो चालू लागे. भिक्षा मागण्याच्या या पध्दतीबद्‌दल आई मतभेद व्यक्त करी.

पीठ घालता घालता एकदा ती त्यालाच बोलली, "तुझं तोंड बंद का ठेवतोस? मुकाबिका आहेस का? अरे, न बोलता तिन्ही त्रिकाळ असा अंगणात उभा राहिलास, तरी कुणी तुला वाढणार नाही."

गोसावी हसला आणि निघून गेला. त्यानंतर आला, म्हणजे थोडावेळ वाट पाही आणि मग 'माई, माई...' अशा हाका मारी.

असा एकदा तो आल्यावर आईने त्याला जोत्यावर बसायला सांगितले. माझे वडील कामासाठी राजधानीच्या गावी जाऊन दीड महिना उलटला होता. दरम्यान आईने फार हलाखी सोसली होती. उधारपाधार, उसनवारी असे किती काळ चालणार?



Scanned with CamScanner

गोसावी बसला तेव्हा चौकटीला हात देऊन आई उंबऱ्यात उभी राहिली. म्हणाली,

''बाबा, तुला बायका-पोरं आहेत का?''

''नाही, माई, मी एकटा आहे.''

''एवढं पीठ मागतोस, तेवढं सगळं खातोस का?''

''थोडं खातो, बाकी साठवतो, वाण्याला विकून टाकतो!''

या खुलाशावर आई थोडी गप्प राहिली. तिने आपली सगळी शक्ती एकवटली आणि म्हणाली ''माझ्या घरात आज पीठ नाही, पोरं भुकेलीत. वाण्याला घालतोस, ते पीठ मला घाल.'' गोसाव्याला वाटले, ही बाई थट्टा करतेय. कपाळावर ठळक कुंकू असलेला तिचा काळासावळा चेहरा गंभीर होता. गंभीरच नव्हे, तर त्यावर वेदनाही होती. या गोसाव्याने दहा घरचे मागून आणलेले पीठ भुकेल्या मुलांना खाऊ घालणे ही गोष्ट तिला फार लाजिरवाणी वाटत असली पाहिजे.

संसाराचे असारपण जाणवलेला तो भगवा माणूसही चार लेकरांच्या आईची ही मागणी बघून हलला. त्याचा निबर चेहरा झाकोळून गेला. ''हां माई!'' एवढंच बोलून तो उठला, चालायला लागला. आई कुठेतरी पाहत उंबऱ्यात उभी राहिली आणि मग कुठेतरी बघत बसून राहिली.

तिची ही कुठेतरी लागलेली दृष्टी मला अगदी स्पष्ट आठवते. अनेक वेळा तिला अशी एकटक बघत बसलेली मी पाहिली आहे.

आपल्या सुखी बालपणाकडे, आईबापांच्या सावलीत होती, त्या दिवसांकडे ती पाहत असेल का?

नाही, मला वाटते, ती त्या भूतकाळात जात नव्हती. तो तिने केव्हाच गंगार्पण केला होता.

ती वर्तमानकाळात आहे, असेही त्या बघण्यावरून वाटत नसे.

खात्रीने ती पुढचे पाहत होती. आणखी पंचवीस-तीस वर्षांपुढे जाऊन मोठ्या झालेल्या मुलांचे कर्तृत्व ती बघत असावी. मुलांचे भरले संसार तिला दिसत असावेत. सर्वत्र सुख आहे, समृद्धी आहे अशा काळात ती मनानं फिरत असावी. तिच्या त्या बघण्यावरून असाच तर्क होई.

तासाभरानं मठबुवा परत आला. पांढऱ्या कापडाची भलीमोठी थैली त्याने पीठ भरून आणली होती. ती उंबऱ्यावर ठेवून तो म्हणाला,

''घे, माई, जेवू देत तुझी मुलं!''

भानावर येऊन आई जागची उठली. तिने ते पीठ घेण्याअगोदर म्हटलं, ''बाबा रे, याचे पैसे द्यायला हवेत; पण ते आज माझ्यापाशी नाहीत. पुढं देईन. चालेल का?''

आईच्या तोंडाकडे बघून गोसावी म्हणाला, ''सावकाश दे!''

गोसाव्याच्या भलेपणाने वितळून जाऊन आई बोलली, ''काळ काही राहत नाही. उद्या माझी मुलं लहानाची मोठी होतील. चार मुलांचे आठ हात मिळवू लागतील. माझं घर भरेल. दुसऱ्याला उचलून काही देण्याइतकी शक्ती माझ्यापाशी येईल... जगला-वाचलास, तर माझी मुलं तुझ्या उपकाराची फेड करतील!''

गोसाव्याला काय वाटलं, कोण जाणे, पण तो गंभीरपणे म्हणाला, ''अशी बळकट आशा मनात ठेवू नकोस, काही वेगळंही घडेल.''

''नाही घडणार. बाबा रे, माझे कष्ट कसे वाया जातील? मुळीच जाणार नाहीत.''

हे तिचे निश्चयाचे बोलणे ऐकल्यावर गोसावी आणखीन काही भविष्यवाणी बोलला नाही. गप्प बसून राहिला आणि मग निघून गेला.

सगळा दिवस आई कुणाशी धड बोलली नाही. दुपारचा स्वयंपाक करून तिने आम्हाला जेवू घातले. स्वतः जेवली नाही. आठवड्यातले तीन वार ती करायची; पण आज कसलाही उपवासाचा वार नसतानाही ती जेवली नाही.

## शब्दार्थ

गर्दी - जमाव - (crowd)
लक्ष - अवधान - (attention)
चेहरा - मुख - (face)
सावकाश - हळुवार - (slow)
सफेद - पांढरा - (white)
गप्प - स्तब्ध/शांत - (quiet)
थैली - पिशवी - (bag)

## स्वाध्याय

### रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. एका बाबतीत मात्र .................................................. वेगळा होता.



Scanned with CamScanner

२. आईने फार ........................................ सोसली होती.

३. तो तिनं केव्हाच ........................................ केला होता.

४. तिच्या त्या बघण्यावरून असाच ........................................ होई.

५. ........................................ स्वयंपाक करून तिने आम्हाला जेवू घातले.

## चूक की बरोबर ते लिहा.

१. साधू गावात दररोज येत असे. ..................

२. गोसाव्याच्या पायात चप्पल होती. ..................

३. वडील दीड महिना गावाला होते. ..................

४. मठबुवा संध्याकाळी परत आला. ..................

५. आई कुणाशीही धड बोलली नाही. ..................

## कोण कोणास म्हणाले ते लिहा.

१. "बाबा, तुला बायका पोरं आहेत का ?"

........................................

२. "हां, माई," एवढे बोलून तो उठला.

........................................

३. "नाही घडणार, बाबा रे !"

........................................

## खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. ओढ्याच्या पलिकडे कोण राहत होते?

........................................

Scanned with CamScanner

२. साधुपुरुष कोणत्या दिवशी गावात येई?

३. लेखकाचे वडील कुठे गेले होते?

४. गोसावी पीठाचे काय करत होता?

५. आई किती वार करत असे?

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. साधुपुरुषाची भीक मागण्याची पध्दत कशी होती?



Scanned with CamScanner

२. आईला कोणती गोष्ट लाजिरवाणी वाटली?

३. आईने गोसाव्याकडे काय मागितले व का?

**वाक्य शुद्ध करून लिहा.**

१. गोसावि हसला आणि निघुन गेला.

२. ति त्या भुतकाळात जात नव्हति.

३. स्वतः जेवलि नाहि.



Scanned with CamScanner

## विरुध्दार्थी शब्द लिहा.

१. आशा X ..........................................  २. बंद X ..........................................

३. सावली X ..........................................  ४. तर्क X ..........................................

५. पांढरा X ..........................................

## लिंग बदला.

१. लेखक - ..........................................  २. आई - ..........................................

३. गोसावी - ..........................................  ४. पुरुष - ..........................................

५. साधू - ..........................................

## वचन बदला.

१. ओढा - ..........................................  २. वाट - ..........................................

३. पीठ - ..........................................  ४. थैली - ..........................................

## वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

१. लाजिरवाणे वाटणे - ..........................................

..........................................

२. भिक्षा मागणे - ..........................................

..........................................

## इंग्रजीत शब्द लिहा.

१. ओढा - ..........................................  २. अंग - ..........................................



Scanned with CamScanner

३. वाट - ................................ ४. कपाळ - ................................

५. सुख - ................................ ६. दिवस - ................................

**"आईचे आपल्या आयुष्यातील महत्त्व" आपल्या शब्दात लिहा.**

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................


................................................................................................

................................................................................................

................................................................................................

# ३. फुलपाखरू

आज सकाळी चमत्कार घडला. मी एकदम पाच-सहा वर्षांचा लहान मुलगा झालो. एक सभा आटोपून मी घराकडे वळलो. अंगणात जे पहिले पाऊल टाकले ते तिथेच खिळून राहिले. माझ्या स्वागताकरिता एक फुलपाखरू तिथे भिरभिरत नृत्य करत होते. जणुकाही पुष्पसृष्टीतले चिमुकले विमानच ! त्याचे ते चिमणे पोपटी पंख, त्या पंखांवरले ते इवले इवले काळे ठिपके आणि या दोन रंगांना उठाव देणाऱ्या त्याच्या शरीरावरच्या अनेक रंगांच्या छटा पाहून मी थक्क झालो. जवाहिऱ्याच्या दुकानात दिसणाऱ्या दागिन्यांकडे मी आजपर्यंत कधीच निरखून पाहिले नाही; पण या फुलपाखराचे ते अद्‌भुत सौंदर्य मी अधिऱ्या डोळ्यांनी टिपत होतो. माझ्या मनात लपवून ठेवत होतो; पण पुढल्याच क्षणी रातराणीच्या सुगंधाप्रमाणे ते अचानक गुप्त होत होते.






Scanned with CamScanner

त्या चिमण्या फुलपाखराचे रंग पाहून मला वाटले, जिच्यावर इंद्रधनुष्याची तोरणे उभारलेली आहेत, जिच्या घाटाच्या पायऱ्या कुबेराच्या भांडारातल्या नवरत्नांनी घडवलेल्या आहेत; अशा कुठल्यातरी स्वर्गीय नदीच्या परिसरात या फुलपाखराचा जन्म झाला असावा !

आमच्या अंगणात येऊन ते का खेळते आहे, हेच मला कळेना. आमच्या घराभोवती बाग नाही किंवा सुंदर फुले नाहीत. त्याला आकर्षक वाटावे असे इथे काहीच नाही. तरीही ते वेडे स्वतःभोवती सर्कशीतल्या मृत्युगोलात मोटारसायकल फिरवणाऱ्या साहसी खेळाडूप्रमाणे पुन्हा पुन्हा वळत आणि फिरत राहिले आहे.



त्याच्याकडे पाहता पाहता मी भान विसरून गेलो. त्याला पाहण्यासाठी त्याचा पाठलाग करू लागलो. अंगण उघडे आहे आणि रस्त्यावरून जाणारी, येणारी माणसे फुलपाखराचा पाठलाग करणाऱ्या एका वयस्क माणसाकडे पाहून हसत आहेत, याची मला कल्पनाच नव्हती. त्या फुलपाखराला पाहिल्यापासून मी एका नव्या जगात प्रवेश केला होता. तिथे फक्त आम्ही दोघेच होतो. ते फुलपाखरू अनेकदा माझ्या अगदी जवळ येऊन दुसऱ्याच क्षणी ते मला हुलकावणी देऊन पुन्हा दुसरीकडे जात असे.

त्याने कितीवेळा मला अशा गोड हुलकावण्या दिल्या, याची गणतीच करता येणार नाही. त्याला सोडून मला घरात जाववेना. मी त्याच्याकडे पाहत उभा राहिलो आणि कुठल्या क्षणी ते भुर्रकन दूर गेले, तेही मला कळले नाही. गाण्याची एखादी अतिमधुर लकेर कानावर पडावी आणि लगेच विरून जावी, तसे मला झाले.

ते फुलपाखरू मी पाहिल्याला आता बारा तास झाले आहेत. रात्रीचे अकरा वाजले आहेत. दिवसा एखाद्या अवखळ पोराप्रमाणे हुंदडणारे हे घर शांतपणे झोपी गेले आहे. ते नाना प्रकारची स्वप्ने पाहत आहे, पण मी मात्र माझ्या अंथरूणावर या कुशीवरून त्या कुशीवर वळत पडलो आहे.



Scanned with CamScanner

खिडकीतून आलेल्या चांदण्याने माझ्या उशीला नवा सुंदर जाळीदार अभ्रा चढवला आहे; पण त्याचे सौंदर्य मला मोहवू शकत नाही. मला राहून राहून त्या फुलपाखराची आठवण होत आहे.

ते या वेळी कुठे असेल? दमून झोपले असेल? फुलपाखरे झोप कशी घेतात ? कुठे घेतात ? मला जशी त्याची आठवण होत आहे, तशी त्याला माझी आठवण होत असेल का ? ते कधी मला दिसेल का? दिसले तर तेच ते फुलपाखरू म्हणून मला ओळखता येईल का? या विशाल विश्वात कुठेतरी त्याचा जन्म झाला; कुठेतरी माझा झाला! आज दुपारी योगायोगाने आमची दोघांची भेट झाली; पण ती पुन्हा कधी होईल का?

ती होवो अथवा न होवो, त्या फुलपाखराला मी कधीही विसरू शकणार नाही. ते जागेपणी मला दिसणार नाही; पण ते निश्चित माझ्या स्वप्नात येईल.

मनुष्य स्वप्नावर जगतो तो काय उगीच !

## शब्दार्थ

सकाळ - प्रातःकाळ - (morning)
नृत्य - नाच - (dance)
कान - कर्ण - (ear)
चांदण्या - तारे - (stars)
आठवण - स्मरण - (remembrance)
घर - गृह - (house)
गोड - मधूर - (sweet)
अवखळ - द्वाड - (mischievous)
खिडकी - वातायन - (window)
विश्व - जग - (world)

## स्वाध्याय

ST. MARY'S ENGLISH SCHOOL LIBRARY No. JALNA

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. एक ........................................ आटपून मी घराकडे वळलो.

२. ........................................ छटा पाहून मी थक्क झालो.

३. त्याला ........................................ वाटावे असे इथे काहीच नव्हते.



Scanned with CamScanner

४. याची मला ........................................................ नव्हती.

५. त्या ........................................................ मी कधीही विसरू शकणार नाही.

## वाक्य शुध्द करून लिहा.

१. आमच्या घराबोवती बाघ नाहि.

.....................................................................................................

.....................................................................................................

२. तीथे आम्हि दोगेच होतो.

.....................................................................................................

.....................................................................................................

३. पन ते निश्चित माझ्या स्वप्नात येईल.

.....................................................................................................

.....................................................................................................

## खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. सकाळी कोणता चमत्कार घडला?

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

ENGLISH SCHOOL LIBRARY No. JALNA

२. लेखकाने आजपर्यंत कशाकडे निरखून पाहिले नव्हते?

.....................................................................................................

Scanned with CamScanner

३. लेखकाच्या उशीला कोणी अभ्रा चढविला?

४. लेखकांना कोणती कल्पना उरली नव्हती?

५. मनुष्य कशावर जगतो?

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. चिमण्या फुलपाखराला पाहून लेखकाच्या मनात काय आले?

२. 'त्याने मला गोड हुलकावण्या दिल्या' असे लेखक का म्हणतात?

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

३. फुलपाखरू गेल्यावर लेखकाच्या मनात त्याच्याविषयी कोणते विचार आले?

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

**विरुध्दार्थी शब्द लिहा.**

१. नवे X ........................ २. गोड X ........................

३. आठवण X ........................ ४. सुंदर X ........................

**वचन बदला.**

१. फुलपाखरू - ........................ २. विमान - ........................

३. माणूस - ........................ ४. स्वप्न - ........................

**वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१. भान विसरणे - ................................................................

................................................................................

................................................................................



Scanned with CamScanner

२. पाठलाग करणे - ........................................................................

३. थक्क होणे - ........................................................................

**''माझे आवडते फुलपाखरू' या विषयावर दहा ओळींचा निबंध लिहा.**



Scanned with CamScanner